# प्रेस नोट

**परीमंडळ २ पुणे शहर विभागातील स्वारगेट पोलीस ठाण्याचे हद्दीतील सराईत गुन्हेगारास पुणे शहर पिंपरी-चिंचवड आयुक्तालयाचे व पुणे जिल्ह्यातून दोन वर्षासाठी हद्दपार केलेबाबत**

दिनांक :०३/०५/२०१९

स्वारगेट पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सराईत गुन्हेगार **इसम नामे:- मयुर उर्फ अक्षय मनोज कांबळे.वय.२४ वर्षे रा.४२९/३०, डायस प्लॉट, गुलटेकडी, पुणे** यास महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५६ (१) (अ) (ब) प्रमाणे पोलीस उप आयुक्त परीमंडळ-२, पुणे शहर यांचेकडील तडीपार आदेश क्रमांक २५/२०१९ दिनांक ०३/०५/२०१९ रोजी दोन (०२) वर्षा करीता पुणे शहर,पिंपरी चिंचवड आयुक्तालयाचे व पुणे जिल्ह्याचे हद्दीबाहेर तडीपार करण्यात आले आहे. सदर इसम हा खूनाचा प्रयत्न, जबरी चोरी करणे, गंभिरदुखापत करणे, घातक शस्त्रे जवळ बाळगणे, शिवीगाळ करुन मारहाण करणे,नुकसान करणे वगैरे गंभीर गुन्हे करत आहे. त्याचे विरुध्द स्वारगेट पोलीस ठाणे व रायगड पोलीस स्टेशन पुणे ग्रामीण येथे वरील प्रमाणे गुन्हे दाखल असून त्याची सदर भागात दहशत असल्याने त्यास **बच्चन सिंह, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-२, पुणे शहर** यांनी पुणे शहर, पिंपरी-चिंचवड आयुक्तालयाचे व पुणे जिल्ह्याचे हद्दीबाहेर दोन (०२) वर्षा करीता तडीपार केले आहे.

नागरीकांना तडीपार इसम दिसून आल्यास नजीकच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.